६७४१७

**आरबीआय / २००५-०६ / १८८**
**डीजीबीए. जीएडी. क्र. एच. ४१२ / ४२.०१.०३४/ २००५-०६**

ऑक्टोबर २५, २००५
कार्तिक ३, १९२७ (श)

अध्यक्ष / अध्यक्ष व कार्यकारी संचालक
सर्व प्रतिनिधी बँका
जम्मू अँड काश्मीर बँकेसह

प्रिय महोदय,

**ओल्टास – ड्रॉप बॉक्स सुविधा – थेट कर चलान्स**

आयकर संचालनालय (प्रणाली) यांनी कळवले आहे की ऑनलाईन कर लेखा प्रणाली (ओल्टास)च्या पॅन/टॅनच्या डेटा एंट्री मध्ये चुका सापडत आहेत. या चुकांचे एक कारण म्हणजे निर्धारितीने चलन ड्रॉप बॉक्स मध्ये टाकणे त्या पद्धतीत बँक अधिकारी कर भरणाऱ्याकडून मूळ माहिती घेऊ शकत नाहीत व सरळ चलनाप्रमाणे ओल्टास मध्ये माहिती भरतात.

२) या चुका मुळातच काढून टाकण्यासाठी ओल्टास वरील उच्च अधिकार समिती ने ठरवले आहे की थेट कर चलान ड्रॉप बॉक्स मध्ये टाकली जाऊ नयेत. अधिकृत शाखांनां कळवण्यात यावे की ड्रॉप बॉक्स मध्ये थेट कराच्या चलान्स न टाकण्याबद्दल योग्य ती सूचना शाखेत लावावी.

आपला विश्वासू
एम. टी. वर्गीज
महाव्यवस्थापक